## प्रार्थना

ऐसा येई बा । साई दिगंबरा । अक्षयरूप अवतारा ।
सर्वंहि व्यापक तूं । श्रुतिसारा ।
अनुसयाऽत्रिकुमारा ।। ध्रु० ।।

काशी स्नान जप, प्रतिदिवशीं । कोल्हापुर भिक्षेसी ।
निर्मल नदि तुंगा, जल प्राशी ।
निद्रा माहुर देशीं ।। ऐ० ।।१।।

झोळी लोंबतसे वाम करीं । त्रिशूल डमरू–धारी ।
भक्ता वरद सदा सुखकारी ।
देशील मुक्ती चारी ।। ऐ० ।। २ ।।

पायी पादुका । जपमाला कमंडलू मृगछाला ।
धारण करिशी बा । नागजटा मुगुट
शोभतो माथां ।। ऐ० ।। ३ ।।

तत्पर तुझ्या या जे ध्यानीं । अक्षय त्यांचे सदनीं ।
लक्ष्मी वास करी दिनरजनीं ।
रक्षिसि संकट वारूनि ।। ऐ० ।। ४ ।।

या परिध्यान तुझें गुरूराया । दृश्य करीं नयनां या ।
पूर्णानंदसुखें ही काया ।
लाविसि हरिगुण गाया ।। ऐ० ।। ५ ।।